न्याय या तत्त्वांवर अधिष्ठीत असलेले दिसून येते. अलिकडील राजकारणांशी तुलना करता त्यांचे राजकीय व्यक्तिमत्त्वाच्या वेगवेगळया पैलू फारच कौतुकास्पद वाटतात. युध्दतंत्राचे डावपेच त्यांना अवगत होते, योजना पार पाडण्यासाठी, माहिती प्राप्त करण्यासाठी लागणारी सांकेतिक भाषा, बहुरूपी सोंगे, पशु-पक्षींचे आवाज ही वारसारुपाने त्यांना कौशल्य लाभली होती. राज्यनिर्मिती करण्यासाठी आवश्यक संघटन कौशल्य व नेतृत्वधारकता त्यांच्याजवळ होती. उमाजींना ज्यावेळी पहिल्यांदा अटक करण्यात आली, त्यावेळी तुरुंगात असताना त्यांनी तिथल्या तुरुंग अधिकाऱ्यांकडे लिहीता वाचता येण्याची ईच्छा व्यक्त केली. शिक्षणाचे महत्त्व ओळखून ते अल्पप्रमाणात का होईना साक्षर झाले. उमाजींचे चारित्र्य निष्कलंक होते. बहुपत्नीत्वाची पध्दती असूनही ते एकपत्नीव्रता राहिले. त्यांच्या टोळीतील साथीदारांनाही त्यांनी स्त्रियांशी गैरवर्तन करायचे नाही असा सज्जन व कडक दम दिला होता. सामान्य व्यक्तीपासून ते राजे-सरदारांपर्यंत दारु पिणे ही गोष्ट त्यावेळी हौसेची, मजेची, सवयीची होती. पण डोंगर दऱ्यात वावरणारे उमाजी नाईकांनी दारुमुळे होणारे लक्षात घेऊन नंतर ते शेवटपर्यंत दारुपासून लांब राहिले. उमाजींना कसल्याही प्रकारचा सत्ता व संपत्तीचा मोह नव्हता. राजे-सरदार आपआपसात सत्ता, संपत्तीसाठी एकमेकांत युध्द खेळत होते, स्वकीयांशी गद्दारी करुन इंग्रजांशी हातमिळवणी करते होते. अशावेळी उमाजींनी बंड पुकारले. ते स्वकीयांसाठी चोरी-दरोडे यातून मिळालेली संपत्ती ते स्वातंत्र्यलढ्यासाठी वापरत. त्याचबरोबर टोळीतील साथीदारांच्या उदरनिर्वाहासाठी त्यांना वाटत असत. गरजू लोकांना मदत करणे, भट-ब्राम्हणांना दान-दक्षिणा देणे, बैरागी, गोसावींना काही ना काही देणे, जेजूरी तसेच इतर मंदिरात दान देणे, दक्षिणा देणे अशा प्रकारे उमाजींचे व्यक्तिमत्त्व हे निस्वार्थी व दानशूर दिसते. उमाजींच्या टोळीत व त्यांनी इंग्रजांविरुध्द काढलेल्या जाहिरनाम्यात समाजातील सर्व स्तरातील, जाती-धर्मातील सहभाग आढळता. स्वराज्याच्या ध्येयप्राप्तीसाठी त्यांनी सर्वांना एकत्र घेऊन कार्य केलेले दिसते.

**निष्कर्ष :**

उमाजींनी राजकीय नेतृत्वाद्वारे स्वराज्यप्राप्ती करून इंग्रज सरकारला इथून हाकलवून देऊन शिवाजी महाराजांप्रमाणे इथं स्वराज्य स्थापन करण्याची आस बाळगली होती. डोंगरदऱ्यात, जंगल-कपाऱ्यात वावरणारे मात्र स्वत:चेच नव्हे तर संस्थानिकांपासून सर्वसामान्यांपर्यंत गेलेले अधिकार, हक्क, सत्ता पुन्हा प्राप्त करण्यासाठी या अडाणी, अशिक्षित माणसाने स्वत:च्या प्राणांचीसुध्दा पर्वा केली नाही. उमाजींचे वैर ब्रिटीशांशी होते. त्यांच्या गुन्हेगारी वृत्तीशी होते. ब्रिटीशांना घालवून, स्वराज्य स्थापण्याच्या त्यांचा संकल्प होता. मात्र उमाजींचे हे बंड मोडून काढण्यासाठी इंग्रजांनी फार कसोशीने प्रयत्न केले पण यश आले नाही. उघड युध्द करून उमाजी सापडणे अशक्य असल्याने आर्थिक प्रलोभन दाखवून मोठ्या फितुरीने इंग्रजांनी उमाजींस पकडले. व उमाजींचे हे राजकीय बंड थांबले. उमाजींना देशद्रोही ठरवून त्यांना दि. 3 फेब्रुवारी 1832 रोजी पुणे इथे फाशी देण्यात आली. त्यांच्या या बंडाची इंग्रजांनी इतकी धास्ती घेतली होती की, फाशी दिल्यानंतर त्यांचे प्रेत तीन दिवस झाडाला लटकवून ठेवले होते की जेणेकरून पुन्हा असे बंड समाजमानसामध्ये कोणी करण्याचे धाडस करू नये. एकूणच पहाता उमाजी नाईकांनी ब्रिटीशांविरोधात जो लढा दिला, त्यावरून त्यांचे स्वत:च्या स्वराज्याप्रती असणारी राष्ट्रनिष्ठेची भूमिका स्पष्ट होते. उमाजींना विश्वासघाताने अटक केल्यानंतर फाशी देण्यापर्वी ज्यांनी उमाजींना अटक केली त्या कॅप्टन मॅकिन्टॉश यांनी उमाजी कैदेत असताना त्यांच्याशी संवाद साधून "An Account of the Origin and Present Condition of the Tribe of Ramoossies, Including the Real Life of the Chief Oommiah Naik" हे पुस्तक लिहीले. या महत्त्वाच्या दस्तावरून लक्षात येते की, उमाजी नाईकांचा हा राजकीय लढा स्वातंत्र्य, समता, न्याय या तत्त्वांवर अधिष्ठीत होता. इंग्रजांविरुध्द जनतेसाठी उमाजींनी 1831 साली पहिला जाहिरनामा प्रसिध्द केला व राजकीय स्वातंत्र्यलढा उभा करून स्वराज्य निर्मितीचे स्वप्न पाहिले म्हणून त्यांच्या या बंडाचा आढावा घेता त्यांना "आद्य क्रांतीवीर" उमाजी नाईक म्हणून गौरविले जाते.

**संदर्भ :**

1. Mackintosh, 'An Account of the Origin and Present Condition of the Tribe of Ramoossies, Including the Real Life of the Chief Oommiah Naik', Bombay:American Mission Press, 1833.
2. आठवले सदाशिव, 'उमाजीराजे, मुक्काम डोंगर', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, 1991.
3. डॉ. पोतदार माधव, 'महाराष्ट्रातील लढे आणि लढवय्ये', अनुबंध प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 25 जून 2006.
4. डॉ. भोळे भास्कर लक्ष्मण, 'राजकीय सिध्दांत आणि विश्लेषण', पिंपळापुरे बुक डिस्ट्रि ब्युटर्स, नागपूर, 2006.

# सविनय कायदेभंग चळवळ आणि महाराष्ट्रातील जंगल सत्याग्रह : एक ऐतिहासिक अभ्यास

**प्रा. संदिप भैरू जाधव,** सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर, sandipj2014@gmail.com

---

**प्रस्तावना:-**

२० व्या शतकामध्ये कॉंग्रेसने सर्वच घटकांना स्वातंत्र्य मिळविण्यासाठी राष्ट्रीय चळवळीमध्ये समाविष्ट करून घेतले. शेतकरी वर्गही त्याला अपवाद नव्हता. मुळातच सरकारच्या वसाहतवादी धोरणांमुळे जीवन जगणे असह्य झालेल्या शेतकऱ्यांनी सरकारविरोधी संघर्षाची भूमिका घेतली होतीच. पण त्याचे स्वरूप राष्ट्रव्यापी नव्हते. परंतु विसाव्या शतकामध्ये शेतकऱ्यांच्यात जागृती होऊन त्यांच्यात आर्थिक शोषणाची जाणीव निर्माण होऊ लागली. त्यातच १९३० च्या दशकात शेतकऱ्यांच्यामध्ये सरकारविरोधी मोठ्या प्रमाणावर असंतोष निर्माण झाला होता. अशाच वातावरणात कॉंग्रेस व महात्मा गांधीजींनी सविनय कायदेभंग चळवळ सुरु केली.[1] महात्मा गांधीजींनी पाठविलेल्या अकरा मागण्या व्हाईसरायने नाकारल्याने कॉंग्रेस आणि महात्मा गांधीजींनी सविनय कायदेभंग चळवळ सुरु करून १२ मार्चला साबरमतीहून दांडीयात्रेस प्रारंभ केला आणि ६ एप्रिल १९३० रोजी समुद्रकिनाऱ्यावरील मीठ उचलून मिठाचा कायदा मोडला. त्यानंतर लोकांनी संपूर्ण देशभर मिठाचा सत्याग्रह केला.[2]

मिठाचा कायदा मोडण्याचा कार्यक्रम संपूर्ण मे महिन्यात ठिकठिकाणी राबविल्यानंतर पावसाळ्याची सुरुवात होताच मिठाच्या सत्याग्रहाची जागा जंगल सत्याग्रहाने घेतली.[3] वसाहतकाळात जंगलाच्या वापराबाबत अनेक निर्बंध लादले गेले होते. आरक्षित जंगलात गुरे चरण्यास, गवत किंवा झाडे तोडण्यास मनाई करण्यात आली होती. जंगलासंबंधीच्या कायद्यातील जाचक तरतुदींबद्दलचा लोकांचा असंतोष लक्षात घेऊन मिठाच्या कायद्याप्रमाणेच जंगलासंबंधीचे कायदे मोडून सत्याग्रह मोहिमेची व्याप्ती वाढविण्याचा निर्णय कॉंग्रेसने घेतला.[4]

**जंगल सत्याग्रह:-**

जंगलाचा वापर केल्याबद्दल लोकांनी जो कर द्यावयाचा तो देण्याचा नाकारून सरकारने जंगलाबाबतच्या केलेल्या कायद्यांचा भंग करणे म्हणजे जंगल सत्याग्रह. मिठाच्या सत्याग्रहापेक्षा जंगल सत्याग्रह हा पूर्णपणे वेगळा होता. मिठावरील कर हा जनतेवरील अप्रत्यक्ष कर होता. त्यामुळे लोकांना तो प्रत्यक्ष जाणवत नव्हता. परंतु वनचराईसाठीचा किंवा इतर जंगलविषयक कर आणि जंगलाचा वापर करण्याबद्दलचे निर्बंध हे शेतकऱ्यांना प्रत्यक्ष जीवनाशी निगडीत असल्यामुळे त्याची व्याप्ती अधिक होती.[5]

**महाराष्ट्रातील जंगल सत्याग्रह:-**

अगोदरच महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागामध्ये जंगलाच्या तक्रारी हा शेतकऱ्यांचा कळीचा मुद्दा होता. त्यातच जागतिक महामंदीमुळे त्यांच्या असंतोषात भरच पडली होती आणि अशा वातावरणात ज्यावेळी कॉंग्रेसने सविनय कायदेभंग चळवळीचा एक भाग म्हणून जंगल सत्याग्रहाचा पुरस्कार करण्यात आला. त्यावेळी महाराष्ट्रातील शेतकरी या जंगल सत्याग्रहात मोठ्या संख्येने सहभागी झाले. वनखात्याचे कायदे तोडण्याबाबत आणि साराबंदीचे कार्यक्रम हाती घेण्याबाबत सुरुवातीला महाराष्ट्रातील कॉंग्रेसच्या नेत्यांमध्ये दुमत होते. परंतु नंतर जंगल सत्याग्रहासाठी जंगल सत्याग्रह कमिटी आणि एक युद्धमंडळ नेमून त्याचा हिरीरीने पुरस्कार करण्यात आला.[6]

सुरुवातीला अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर व अकोला हे तालुके जंगल सत्याग्रह करण्यास अनुकूल क्षेत्र ठरतील असे जंगल सत्याग्रह समितीला वाटले आणि तिचे मुख्य कार्यालय संगमनेरला उघडण्यात आले.[7] जून १९३० च्या सुरुवातीपासूनच संगमनेर हे महाराष्ट्रातील कायदेभंग चळवळीचे महत्वाचे केंद्र बनले होते. मध्यवर्ती योजना अंमलात आणण्यासाठी संगमनेर आणि अकोला तालुक्यात अनेक उपशिबिरे संघटीत करण्यात आली होती. दोन महिन्यांच्या प्रचारानंतर २० जुलैला संगमनेर भागात सत्याग्रहाला प्रारंभ झाला. २२ जुलै १९३० रोजी संगमनेर आणि अकोला तालुक्यात आषाढी एकादशीच्या निमित्ताने एकाचवेळी वीस-बावीस ठिकाणी सत्याग्रह करण्यात आला.[8] यावेळी एक लाख शेतकऱ्यांनी कायदा तोडला. कोपरगाव आणि राहुरी तालुक्यातही जंगल सत्याग्रहाचे हे

लोण पसरले होते. त्याचप्रमाणे धुळे, नाशिक, कुलाबा, सातारा आणि काही प्रमाणात पुणे भागात प्रचंड प्रमाणावर सत्याग्रह झाला. कायदेभंग करणाऱ्याला पोलीस अटक करण्यासाठी गेल्यावर हजारो लोक त्यांना प्रतिबंध करीत असल्याचे अनोखे दृश्य चंदनपुरी व सावरगाव खेड्यात दिसले.[9] नाशिक आणि धुळे जिल्ह्यात शेकडो पोलीस पाटलांनी राजीनामे दिले. नाशिकच्या बागलाण तालुक्यातील २४५ पोलीस पाटलांपैकी २०० जणांनी राजीनामे दिले. पोलीस अधिकाऱ्यांविरुद्ध परिणामकारक बहिष्कार घालण्यात आला. ठाणे, पुणे, कुलाबा या जिल्ह्यातील इमारतीचे लाकूड व जंगलातील गवत यावरील लिलावावर यशस्वीपणे निरोधन करण्यात आले. लक्षावधी लोकांनी जंगलाचे कायदे मोडले आणि वनचराईचा कर दिला नाही. हजारो शेतकऱ्यांनी जंगलात गुरे घातली, गवत कापले आणि 'जंगल का कायदा तोड दिया' यासारख्या घोषणा दिल्या. जे गावकामगार पाटील कॉंग्रेसच्या कार्यकर्त्याविरुद्ध न्यायालयात सरकारच्या बाजूने साक्षीदार म्हणून उभे राहिले. त्यांच्यावर जनतेने बहिष्कार घातला. ही खऱ्या अर्थाने लहान प्रमाणावरील करबंदीचीच चळवळ होती.[10]

नाशिक जिल्ह्यात सटाणा, बागलाण, कळवण या तालुक्यात जंगल सत्याग्रह जास्त जोमात होता. भिलवाड व समशेरपूर या गावात शेतकऱ्यांनी जंगल सत्याग्रह केला.[11]

२८ ऑगस्टला सातारा जिल्ह्यातील ३२ ठिकाणी वन कायद्यांचा भंग करण्यात आला. सातारा जिल्ह्यातील बिळाशी गावात शेतकऱ्यांनी जंगल सत्याग्रहाचे वर्णन दक्षिणी शेतकऱ्यांचे सशस्त्र बंड असे करण्यात आले.[12]

पनवेलपासून बारा-तेरा मैलावर असलेल्या चिरनेर या गावात २५ सप्टेंबर १९३० रोजी शेतकऱ्यांनी सत्याग्रह केला. [13] चिरनेरनंतर मोठ्या प्रमाणावर जंगल सत्याग्रह करण्याचे स्थगित करण्यात आले. पण स्थानिक पातळीवर पूर्वीच्याच उत्साहाने आणि गतीने सत्याग्रह चालू होता.

खानदेशात सविनय कायदेभंगाच्या चळवळीतील इतर कार्यक्रमाबरोबरच जंगल सत्याग्रहाचा जोरदेखील मोठ्या प्रमाणात होता. १७ ऑगस्ट १९३० रोजी साक्री तालुक्यातील अष्टाणे गावाजवळ दिवाळयामाळ जंगलात लोकांनी जंगल सत्याग्रह केला.[14] लळिंग जंगल भागात २० ऑगस्ट १९३० रोजी हजारो लोकांनी सत्याग्रह केला. तसेच शहादा तालुक्यातील जयनगर येथील जंगलात ३१ ऑगस्ट १९३० रोजी सत्याग्रह झाला. तसेच नंदुरबार, शिंदखेड याठिकाणीही मोठ्या प्रमाणावर जंगल सत्याग्रह झाले.[15]

दांगुरणा, कुडावद, ठाणेपाडा, धमणार, फत्तेपूर-आमोदे येथील जंगलाच्या बंद भागात स्वयंसेवकांनी सत्याग्रह करून स्वतःला अटक करून घेतली. तत्पूर्वी छडवेल, पखरूण येथील गावकऱ्यांनी सत्याग्रह केला. ऑक्टोबर १९३० च्या मध्यापर्यंत कायदेभंग चळवळीचा जोर होता. यानंतर कार्यकर्त्यांनी विधायक कार्यक्रम व बहिष्कार चळवळीकडे लक्ष वळविले.[16] १९३१ मध्ये साक्री, शिरपूर, शिंदखेडा तालुक्यात शेतकऱ्यांच्या परिषदा झाल्या. या परिषदामधून शेतसारा तहकूब करण्यासारखे ठराव करण्यात आले. सभा व परिषदांचा धुमधडाका चालू असतानाच सरकारने चार अध्यादेश जारी करून चळवळ दडपून टाकण्याची तयारी केली होती. खानदेशातील बहुतांशी सत्याग्रहींना अटक करण्यात आली.[17]

मध्य-प्रांत व बेरारमधील यवतमाळ जिल्ह्यातील पुसद येथे १० जुलै १९३० रोजी लोकांनी हजारोंच्या संख्येने जंगल सत्याग्रह केला.[18] वर्धा जिल्ह्यातल्या तळेगाव, खामगाव येथेही जंगल सत्याग्रह करण्यात आला. जंगल सत्याग्रहाचे लोण बुलढाणा, चांदा, भंडारा या अन्य जिल्ह्यातही पसरले होते.[19]

अमरावती या जिल्ह्यात वडाळी या गावी १७ जुलै १९३० रोजी वडाळी जंगल सत्याग्रहास प्रारंभ झाला. ८ ऑगस्ट १९३० रोजी यावली व डावरगाव, चिंचखेड या गावाच्या जंगलात सत्याग्रहींनी सत्याग्रह केला.[20]

बुलढाणा जिल्ह्यात एकूण १७ केंद्रे जंगल सत्याग्रहाकरिता उघडण्यात आली होती. त्यापैकी जिगाव, म्हैसवाडी, मलकापूर, राजूर, कडनेर, तालसवाडी, अंबेडा, जिगाव, राजूर, अंबोजा, ज्नुना यासारख्या ठिकाणच्या जंगल सत्याग्रहात लीकांनी मोठ्या संख्येने भाग घेतला. चिखली तालुक्यात बुलढाणा, चिखली, देऊळगावराजा, उत्तरपेठ या चार केंद्रात कायदेभंग झाला. मेहेकर तालुक्यात मेहेकर, देऊळगाव, साकरशा, सुलतानपूर, डोणगाव याठिकाणी जंगल सत्याग्रह झाला. सत्याग्रहास जाणे म्हणजे शुभकार्यास जाणे असे समजले जाऊ लागले.[21]

अकोला जिल्ह्यात एकूण १९ ठिकाणी जंगल सत्याग्रह झाला. यवतमाळ जिल्ह्यात पुसद, करळगाव, चौसाळा येथील जंगलात सत्याग्रह झाला. भंडारा जिल्ह्यात चिंचोली, मुर्दोली, तेलीनाला, चोरखमरा, सोनकुंड, मंगेसरी, बळी मेंडकी याठिकाणी जंगल सत्याग्रह करण्यात आला. चंद्रपूर जिल्ह्यात लोहारा आणि तळेगाव येथे जंगल सत्याग्रह झाला.[22]

मध्य-प्रांत व बेरारमधील अनेक भागात ज्यामध्ये चांदा, अमरावती, बैतूल, भंडारा यासारखे महाराष्ट्रातील जिल्हे सविनय कायदेभंग चळवळीच्या हालचालीचे केंद्र झाले. प्रत्येक ठिकाणी जंगल सत्याग्रह नियंत्रणाच्या बाहेर जाण्याची प्रवृत्ती दिसून येत होती. या सर्व क्षेत्रामध्ये वनरक्षकांवर किंवा पोलीस दलावर हिंसक आक्रमण सर्वसामान्य गोष्ट बनली होती. नंतरच्या 'कॉंग्रेस हिंसा' या सरकारी सूचीमध्ये जुलै ते ऑक्टोंबर १९३० च्या दरम्यान मध्य-प्रांत व बेरारमध्ये अशा १० आणि मे ते ऑक्टोबर १९३० च्या दरम्यान बॉम्बे प्रेसिडेन्सीमध्ये अशा २० घटना घडल्याची नोंद आहे.[23]

थोडक्यात मिठाच्या सत्याग्रहाने शेतकरी जागा झाला नाही. परंतु जंगल सत्याग्रहाने मात्र ते काम केले. हा जंगल सत्याग्रह म्हणजे जनतेचा लढाच होता. या चमत्कृतिपूर्ण बदलाने सरकारही गोंधळून गेले. १९३० सालच्या सविनय कायदेभंग चळवळीच्या राष्ट्रव्यापी आंदोलनामुळे स्वातंत्र्य चळवळीला प्राप्त झालेले जनतेचे प्रचंड समर्थन नष्ट करण्यासाठी सरकारने जबरदस्त दमनचक्र सुरु केले.[24] ही चळवळ दडपण्यासाठी सरकारने कायदेभंग चळवळीशी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संबंधित अशा संघटना २१ ऑगस्ट रोजी क्रिमिनल लॉ अमेंडमेंट अॅक्टखाली (Criminal Law Amendment Act) बेकायदा ठरविल्या. सत्याग्रहाचे पुढारी आणि स्वयंसेवकांना पकडण्यात आले. पण त्याचा शेतकऱ्यावर काहीही परिणाम झाला नाही. सरकारने हिंसात्मक मार्ग स्वीकारला.[25] जनतेत दहशत निर्माण करून त्यांच्यात प्रादुर्भित झालेली प्रतिकाराची वृत्ती समूळ निपटून टाकण्याचा लॉर्ड विलिंगडन यांचा मानस होता. याचवेळी शेतकऱ्यांकडून शेतसारा पोलिसांच्या मदतीने जबरदस्तीने वसूल करण्यात येऊ लागला आणि कर वसूल करण्याकरता तर मुंबईत पोलिसांचा फौजफाटा ठेवण्यात आला.[26] शेतकऱ्यांची जप्त केलेली मालमत्ता त्यांना परत करण्याच्या दृष्टीने कोणतीच हालचाल सरकार करीत नव्हते. जुन्या अध्यादेशाबरोबर नवे अध्यादेश काढून जनतेची जास्तीत जास्त मुस्कटदाबी करण्याचा सरकार प्रयत्न करीत होते. सन १९३२ मध्ये राष्ट्रसंघाने(League of Nations) भारतातील महामंदीची तीव्रता जाणून घेण्यासाठी पाठविलेल्या प्रतिनिधींनी नमूद केले होते कि, "attachment of property, usually a revenue process, had now became a police job. The police raided the villages, beat the foremost resisters, seized livestock, fodder, foodstuff from them, pulled down parts of houses and none of these can be questioned in a court of low."[27]

जंगल सत्याग्रह गरीब शेतकऱ्यांनी उचलून धरला. ज्या ठिकाणच्या जंगलात लोकांना जाण्यासाठी सरकारकडून बंदी घालण्यात आली होती आणि जेथे वनचराई व लाकडे आणल्याबद्दल सरकारकडून कर वसूल केले जात होते. अशा ठिकाणी जंगल सत्याग्रहाचा जोर अधिक होता.[28] थोडक्यात सविनय कायदेभंग चळवळीमध्ये महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी भाग घेऊन विविध भागामध्ये जंगल सत्याग्रह घडवून आणले आणि त्यांनी स्वातंत्र्यचळवळीतील जंगल कायद्याविरुद्धचे आंदोलन यशस्वी केले. महाराष्ट्रात जंगल सत्याग्रहाची ही चळवळ वणव्यासारखी पसरली.[29]

**सारांश:-**

महाराष्ट्रातील शेतकरी अगोदरच जागतिक महामंदी आणि सरकारच्या वसाहतवादी धोरणामुळे नागविला जाऊन त्यांच्यात मोठ्या प्रमाणावर असंतोष निर्माण झाला होता. अशा वातावरणात जेव्हा कॉंग्रेस आणि महात्मा गांधीजींनी जंगल सत्याग्रह हा सविनय कायदेभंग चळवळीचा एक भाग बनवून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना या चळवळीमध्ये समाविष्ट करून घेतले. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी सविनय कायदेभंग चळवळीमध्ये भाग घेऊन विविध भागामध्ये जंगल सत्याग्रह घडवून आणले आणि त्यांनी स्वातंत्र्य चळवळीतील जंगल कायद्याविरुद्धचे आंदोलन यशस्वी केले. जंगल सत्याग्रहाची चळवळ महाराष्ट्रामध्ये वणव्यासारखी पसरली. जंगल सत्याग्रहामध्ये

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर जसा भाग घेतला तसा आधीच्या चळवळीत त्यांनी कधीही भाग घेतला नव्हता.

काँग्रेस आणि महात्मा गांधीजींनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांमध्ये सरकारच्या वसाहतवादी धोरणामुळे निर्माण झालेल्या असंतोषाला जंगल सत्याग्रहाला सविनय कायदेभंग चळवळीचा भाग बनवून त्या असंतोषाला वाट करून दिली. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेल्या या असंतोषाचा फायदा घेऊन त्यांना आपल्या छत्राखाली ओढून राष्ट्रीय चळवळ बळकट करण्याचा प्रयत्न कॉंग्रेसने केला. थोडक्यात महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या मनात निर्माण झालेल्या या असंतोषाचा फायदा आपली ग्रामीण भागातील बांधणी मजबूत करण्यासाठी कॉंग्रेसने घेतला. याचा प्रत्यय पुढे १९४२ च्या चळवळीत महाराष्ट्रात दिसून आला.

**संदर्भ :-**

1. Pandey S. M., The Emergence of Peasant Movement in India: An Area Study, Indian Journal of Industrial Relations, Vol. 7, No.1, July, 1971, Page No. 69.

2. Sugata Bose and Ayesha Jalal, Modern South Asia (History, Culture, Political Economy) Third Edition, Oxford University Press, New Delhi, 2014, Page No. 131-32.

3. भोसले (डॉ.) अरुण, दक्षिण महाराष्ट्र : चळवळी व नेतृत्व, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २०२२, पृ. १८३.

4. देव शं. द., महाराष्ट्रातील कायदेभंगाचा इतिहास, महाराष्ट्र कायदेभंग मंडळ, पुणे, १९३१, पृ. ४७.

5. कुबेर (डॉ.) वा. ना., भारताचा स्वातंत्र्यलढा : १९३०-३४, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००२, पृ. २०१.

6. देव शं. द., उपरोक्त, पृ. ४७.

7. Brahme Sulabha and Upadhaya Ashok, Agrarian Structure, Movements & Peasant Organisations in India, Volume II Maharashtra, V. V. Giri National Labour Institute, Noida(U.P.) in association with Manak Publications PVT. Ltd, New Delhi, 2004, Page No.145.

8. पवार (डॉ.) दत्ता, खोबरेकर (डॉ.) प्रकाश (कार्यकारी संपादक), भारतीय इतिहास आणि संस्कृती, त्रैमासिक, वर्ष ५० जानेवारी- मार्च २०१४, संपादक मंडळ, दादर, मुंबई, पृ.४५

9. फडके य. दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड-४, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, जून १९९३, पृ. ६९.

10. कुबेर (डॉ.) वा. ना., उपरोक्त, पृ. २०५-२०६ .

11. Bombay Presidency Police Abstract of Intelligence, 13 Sept., 1930.

12. पवार (डॉ.) दत्ता, खोबरेकर (डॉ.) प्रकाश (कार्यकारी संपादक) भारतीय इतिहास आणि संस्कृती, त्रैमासिक, वर्ष ५० जानेवारी - मार्च २०१४, संपादक मंडळ, दादर, मुंबई, पृ.३१

13. The Tines of India, 30 January, 1931,
The Bombay Chronicle, 25/11/1931

14. शहा (डॉ.) मु. ब.(संपा), खानदेशचा सांकृतिक इतिहास खंड. ३ :भाषा आणि लोकदैवते, का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे, जानेवारी २००४, पृ. ६२-६३

15. कुबेर (डॉ.) वा. ना., उपरोक्त, पृ. २०११.

16. शहा (डॉ.) मु. ब. (संपा), उपरोक्त, पृ. ६३.

17. कित्ता, पृ. ६३-६४.

18. Pendse(Mudholkar) Aruna, Peasant Movement in Maharashtra : A case-study of the Shetkari Sanghatana, Thesis submitted for the Ph.D. Degree of University of Poona, Department of Politics and Public Administration, February 2019, Page No. 41.

19. फडके य. दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड-४, उपरोक्त, पृ. ७८.

20. कोलारकर (डॉ.) श. गो., आधुनिक विदर्भाचा इतिहास- १८८५-१९४७, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २००३, पृ. १३५-३६.

21. कित्ता, पृ. १३७-३८.

22. कित्ता, पृ. १३८-४५.

23. सरकार सुमित, आधुनिक भारत १८८५-१९४७, अनुवाद शुशीला डोभाल, राजकमल प्रकाशन, नवी दिल्ली, पन्द्रहवी आवृत्ती-२००९, पृ. ३१८.

24. Pandey S. M., Op-Cit, Page No. 70.

25. कुबेर (डॉ.) वा. ना., उपरोक्त, पृ. २०६.

26. Gopal S., The Viceroyalty of Lord Irwin, 1926-1931, Historical Serious, Oxford University Press, Oxford, New York, 1957, Page No. 80.

27. Desai A. R.(Ed.), Peasant Struggles in India, Oxford University Press, New Delhi, 1982, Page No. 314.

28. कुबेर (डॉ.) वा. ना., उपरोक्त, पृ. २११.

29. कित्ता, पृ. २०५.